संक्षिप्त फौजदारी केस नं. ७५/२०२४
नि. क्र. २१

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ चा जबाब शपथेवर सुरु.**

**नाव** – रोशणी चंद्रकांत चांदीवडे,

**वय**– ४६ वर्षे , **व्यवसाय** – शेती,

**राहणार**– करजुवे, ता. संगमेश्वर, जि.रत्नागिरी.

**अभियोगपक्षातर्फे सरतपास सहाय्यक सरकारी अभियोक्ता कु. एस. आर. वनकर यांचेकडून –**

**०१**. आरोपी माझ्या गावातील रहिवाशी असल्याने मी त्याला ओळखते. दिनांक ०८/०१/२०२४ रोजी माध्यमिक विद्यालय, करजूवे येथे वार्षीक स्नेहसंमेलनाचा कार्यक्रम होता. त्यासाठी शाळेमध्ये सर्व पालक हजर होते. सदरचा कार्यक्रम रात्री ०८:३० ते पहाटे ०३:३० पर्यंत होता. पहाटे ०१:०० ते ०१:३० च्या सुमारास पाऊस पडायला सुरूवात झाली. पुढे काय झाले हे मला माहित नाही. मी त्यावेळी शाळेतच हजर होते. असे काही घडले नाही की, त्यादिवशी माझ्यासोबत अपर्णा चांदीवडे, शितल चांदीवडे हजर होते व पाऊस पडायला लागल्याने आम्ही सर्वजन आमच्या घरी जाण्यास निघालो होतो.

**(साक्षीदार पूर्वीच्या जबानीशी विसंगत साक्ष देत असल्याने विशेष सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासाच्या स्वरुपात प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली, परवानगी मंजूर.)**

**०२**. हे मला माहिती नाही की, अपर्णा चांदीवडे हिला हायस्कूलकडून माखजन बाजूकडे जाणाऱ्या एका दुचाकीने भरधाव वेगात येवुन ठोकर दिली होती अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, ठोकर दिल्यामुळे अपर्णा चांदीवडे ही खाली पडली होती व तिच्या नाकातून रक्त येवु लागल्यामुळे मी तिला प्यायला पाणी दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, समोरुन एक रिक्षा येत असल्याने त्यामध्ये बसून अपर्णा चांदीवडे हिला आम्ही दवाखान्यात उपचाराकामी पाठवून दिले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी

धडक देणाऱ्या आशीष नलावडे यांच्या दुचाकीचा क्रमांक मी पाहिला होता व तो एमएच–०८–एएम–०१८२ असा होता.

**०३**. हे म्हणणे खरे आहे की, दुसऱ्यादिवशी अपर्णा चांदीवडे मयत झाल्याचे मला समजले होते. पोलीसांनी माझ्याकडे कोणतीही चौकशी केली नाही. पोलीस माझ्या ओळखीचे नाहीत. (*साक्षीदारास तिच्या जबाबातील चिन्हांकीत भाग अ वरील मजकूर वाचून दाखविण्यात आला*). सदरचा मजकूर बरोबर नाही. पोलीसांनी माझ्या जबाबामध्ये तसा मजकूर का नमूद केला आहे याचे मला कारण सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा व गावातील रहिवासी असल्याने त्याला वाचविण्याकरीता मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास – आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. आर. के. शिंदे यांनी नाकारला.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI

Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.07.15 10:51:18 +0530

**(श्रीमती आर. आर. कुलकर्णी)**

दि. १४.०७.२०२५

न्यायदंडाधिकारी वर्ग–१ देवरुख

-:CERTIFICATE:-

I affirm that the contents of this Pdf file order are same words as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | S. A. Bhale |
| Court Name | :- | The Court of Civil Judge (J.D.) & Judicial Magistrate F.C., Deorukh |
| Date | :- | 14/07/2025 |
| Evidence signed by PO. on | :- | 14/07/2025 |
| Evidence uploaded on | :- | 14/07/2025 |